महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/NSP/२०२१/ 74 दिनांक:- 6 JAN 2021

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय, अनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय:- केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती कामकाजासाठी नेमलेल्या नोडल ऑफीसर (INO)यांची माहिती व इतर सुचनांबाबत.

संदर्भ :-1) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई , यांचे पत्र क्र.१८/तंशिसं /विकापत्र/उशिसं-पत्र/२०२०-२१/४०६/दि. २४/१२/२०२०.
2) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)पुणे, यांचे पत्र क्र. उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत/अल्प./ शिष्यवृत्ती/८६९६ दि. १८/१२/२०२०

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यांत येते की , शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी केंद्रशासनाच्या अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत राबविण्यांत येत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेंच्या अंमलबजावणीकरिता सोबत जोडलेल्या संदर्भ क्र. ०२ च्या पत्रात दिलेल्या निर्देशाचे काटेकोर पालन करून आवश्यक ती कार्यवाही संस्थास्तरावर करण्यांत यावी.

( डा. राम निबुदे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, २२६१७९६९, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

महत्त्वाचे - स्पीडपोस्ट/ईमेलद्वारे

क्र: १८/तंशिसं/विकापत्र/उशिसं-पत्र/२०२०-२१/ ४०६
दि. - २४ /१२/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नागपूर / अमरावती / नाशिक / औरंगाबाद.

विषय :- केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती कामकाजासाठी नेमलेल्या नोडल ऑफीसर ( INO ) यांची माहिती व इतर सुचनांबाबत...

संदर्भ - शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण ) पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत/ अल्प./ शिष्यवृत्ती /८६९६ दि.१८/१२/२०२०

उपरोक्त विषयांस अनुसरुन शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण ) पुणे यांचे संदर्भीय पत्र या कार्यालयाला दि.२१/१२/२०२० रोजी ईमेलद्वारे प्राप्त झाले आहे.

तरी, सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना सोबत जोडलेल्या पत्राच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्या.

( प्रमोद्र नाईक )
सहसंचालक ,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

प्रत - मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१. यांना माहितीसाठी सविनय सादर.

सहसंचालक तंत्र शिक्षण
विभागीय कार्यालय, नागपूर.
आवक क्रमांक 27
दिनांक 4 JAN 2021

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३
क्र.उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत अल्प./ शिष्यवृत्ती / 8696 दिनांक- १८.१२.२०२० 2020
प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती कामकाजासाठी नेमलेल्या नोडल ऑफीसर (INO) यांची माहिती व इतर सुचानांबाबत.**

संदर्भ : १. यां संचालनालयाचे पत्र दिनांक २७.०८.२०२०, १५.०९.२०२०, ०८.१०.२०२०, १६.१०.२०२०, ०६.११.२०२०, २७.११.२०२०, ०२.१२.२०२०.
२.अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक F.No.SS-१५/२३/२०२० scholarship-MoMA दिनांक -१८.११.२०२०
३.अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय नवी दिल्ली यांनी दिनांक १०.१२.२०२० रोजी घेतलेली V.C Review meeting.

केंद्रशासनाच्या अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील वेळोवेळी प्राप्त सूचनानूसार सन २०२०-२१ साठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत संचालनालयाकडुन वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

केंद्रशासनाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ व दिनांक १०.१२.२०२० रोजीच्या V.C Review meeting मध्ये केंद्रशासनाकडून खालील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

१.सर्व महाविद्यालयातील शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणारे नोडल अधिकारी हे महाविद्यालयाचे नियमीत कर्मचारी असणे आवश्यक आहे.

२. नोडल अधिकारी यांनी शिष्यवृत्तीच्या अर्जांची पडताळणी केलेल्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे महाविद्यालयात ५ वर्षासाठी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. ( विद्यार्थ्यांचा अर्ज, उत्पन्न प्रमाण पत्र, अल्पसंख्यांक समुदायाचे असल्याचे प्रमाणपत्र , मार्कशिट , आधार कार्ड , रहिवासी प्रमाण पत्र इत्यादी ) विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी आवश्यक असल्यास उपलब्ध करन देणे आवश्यक आहे.

३.महाविद्यालयाच्या प्रार्चायानी नोडल अधिका-यानी पडताळणी केलेल्या अर्जांची यादी ज्यावर विद्यार्थ्यांचे नाव, Application ID, विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम व वर्ष, ही माहिती तसेच त्यावर नोडल अधिकारी यांचे नाव, पदनाम, नमूद करुन शिक्का व स्वाक्षरीसह उच्च शिक्षण संचालनालयाच्या schol.dhepune@gov.in या ई-मेलवर पाठवणे आवश्यक आहे.

४. इयत्ता ११वी /१२वी अभ्यासक्रमाच्या अर्जदारासाठी विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय (Hostel) संबंधित महाविद्यालयाने केलेली असेल तरच Hostel fee देय राहील. इयत्ता १२वी नंतरच्या अभ्याक्रमास शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयाचे Hostel ची पावती/ विद्यार्थ्यांच्या नावे भाडे पावती/विद्यार्थ्यांच्या नावे भाडे करार इत्यादी कागद पत्रे जोडलेली असतील तरच Hostel fee देय असेल, त्यानुसार

Scanned by CamScanner

महाविद्यालयांनी Hostel fee ची पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यानंतरच महाविद्यालयाने Hostel Fee मंजूर करावी.

५. महाविद्यालयाने नेमलेल्या नोडल अधिका-यांनी विद्यार्थ्यांचे अर्ज तपासतांना सोबतची कागदपत्रे त्यांच्या महाविद्यालयाच्या Record नुसार बरोबर असल्याची खात्री करावी. जर विद्यार्थ्याने एखादे कागद पत्र जोडले नसल्यास अथवा आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली नसल्यास असे अर्ज Mark as Defective करावे ज्यामुळे संबंधित विद्यार्थ्याला पुनःश्च बरोबर कागदपत्रे जोडून चुक सुधारण्याची संधी मिळेल.

६. महाविद्यालयांनी केंद्रशासनाकडुन प्राप्त झालेली विद्यार्थ्यांची अंतिम निवड यादी विद्यार्थ्यांचे नाव शिष्यवृत्ती रक्कमेसह महाविद्यालयाच्या फलकावर लावणे आवश्यक आहे.

उपरोक्त सुचना आपल्या विभागातर्गत सर्व महाविद्यालये/संस्थांना तत्काळ देण्यात याव्यात व सदर सुचनांनुसार योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे.

(डॉ. अजिता शिंदे)
क.प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत- माहिती व कार्यवाहीस्तव,

आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबावत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्यासाठी आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

१. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग ,मुंबई
२. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई
३. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग, मुंबई.
४. मा.संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,भांबुर्डा, पुणे.
५. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१
६. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी , दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.
७. कुलसचिव, महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ,फुटाला लेक, नागपूर ४४० ००१
८ .मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-०१-.
- यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.
९. कुलसचिव, सर्व कृषि /अकृषि /अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

प्रत -माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
२) मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

Scanned by CamScanner